# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## ग्राहक तक्रार निवारण मंच
## कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. १२३–२०१०/ दिनांक :

| | |
|---|---|
| श्री. संजय भगवान गोंधळी ,<br>मु. पो. हेरवाड, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर | अर्जदार |
| **विरूध्द** | |
| १) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,<br>मंडल कार्यालय, ताराबाई पार्क, कोल्हापूर<br>२) कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, जयसिंगपूर, जि. कोल्हापूर<br>३) सहाय्यक अभियंता,<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>उप विभागीय कार्यालय, कुरुंदवाड, जि. कोल्हापूर | विरूध्द पक्षकार |

**कोरम** :– १) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. जी.बी.पानकर, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग

(ग्राहक तक्रार निवारण मंच)

विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

**न्याय निर्णय**

श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. संजय भगवान गोंधळी , मु. पो. हेरवाड, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर यांनी परिशिष्ट अ मध्ये ग्राहक तक्रार निवारण मंचाकडे दि. १७.६.२०१० ला महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २००६चे कलम ६.४ व ६.१० नुसार तक्रार दाखल केली आहे. तक्रारीत केलेल्या कथनानुसार तक्रारदार यांनी आपली शेती गट क्र. ४८६ मध्ये ५ अश्वशक्ती वीज जोडणी मिळावी यासाठी दि. १८.६.२००९ रोजी वीज मागणीचा अर्ज नोंदविला व त्याचदिवशी रु. ५०/– प्रोसेसिंग फी भरली. त्यांना दि. १८.९.२०१० रोजी चलन देण्यात आले.

तक्रारदाराचे म्हणण्यानुसार त्यांना कृती मानके विनियमातील तरतुदीनुसार चलन ३० दिवसांचे मुदतीत म्हणजे दि. १८.७.२०१० पर्यंत मिळणे आवश्यक होते, तथापी चलन मिळण्यास २ महिन्याचा विलंब झाला आहे. त्यामुळे विनियमातील तरतुदीनुसार विलंबापोटी भरपाई मिळावी अशी मागणी केली आहे.

तक्रारदाराचे म्हणण्यानुसार त्यांनी दि. ५.१२.२००९ रोजी कपॅसिटर घेवून त्याची तपासणी करुन सर्व कागदपत्रें वि.प.च्या कार्यालयात दिली आहेत, परंतु वीज जोडणी देण्यात आली नाही. त्यामुळे अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, कोल्हापूर यांचेकडे दि. ३.५.२०१० रोजी तक्रार दाखल केली. अंतर्गत कक्षाचा आदेश मान्य न झालेने मंचाकडे तक्रार दाखल केली आहे. अंतर्गत कक्षाने आपल्या आदेशामध्ये ग्राहकाने स्वत: ३ पोलची लाईन उभी करुन घ्यावी व आलेला खर्च ग्राहकाच्या वीज बिलातून कंपनीच्या नियमाप्रमाणे परत द्यावा किंवा सहाय्यक अभियंता, कुरुंदवाड यांनी तक्रारदार यांचे वीज कनेक्शन मुख्य कार्यालयाची मंजुरी मिळालेनंतर प्राधान्याने देण्याची व्यवस्था करावी असे म्हटले आहे.

तक्रारदाराने स्वत: काम करुन घेण्यास असमर्थता दर्शविली. ३ पोलचे काम गृहीत धरुन दि. ८.३.२०१० पर्यंत वीज जोडणी देणे आवश्यक होती, त्यामुळे झालेल्या विलंबाबद्दल भरपाई मिळावी व वीज जोडणी मिळावी अशी मागणी केली आहे. तसेच भरपाई रकमेसह वीज जोडणी मिळण्याचे आदेश पारित व्हावेत अशी मंचाकडे मागणी केली आहे.

नोडल ऑफीसर यांनी आपल्या दि. २४.६.२०१० च्या उत्तरात वि.प.च्या अधिकाऱ्यांनी शेतीसाठीचे नवीन अर्जाची प्रलंबित यादी सादर केली आहे. त्यानुसार तक्रारदार यांना तीन पोलची लाईन लागत असून त्यांचा जेष्ठता क्र. ३४ आहे. तसेच मार्च २००९ पर्यतचे पेड पेंडींग लिस्ट संपविण्यात आले आहे व मार्च २०१० पर्यंतची पेड पेंडींग लिस्ट संपविण्याच्या दृष्टीकोनातून मुख्य कार्यालयाची मंजुरी मिळणेसाठी यादी पाठविणेत आली आहे. सदर मंजुरी मिळताच तक्रारदार यांचे कनेक्शन देण्यात येईल किंवा तक्रारदार स्वत: काम करणेस तयार असले तर त्वरीत वीज कनेक्शन देता येईल असे कथन केले आहे.

प्रस्तुतची तक्रार मंचासमोर दि. २८.७.२०१० ला सुनावणी घेतली असतां, तक्रारदार स्वत: हजर. वि.प.तर्फे श्री. शिंदे, सहाय्यक अभियंता, कुरुंदवाड उप विभाग हजर. तक्रारदाराने अर्ज करुन चलन मिळालेनंतर पैंसे भरले व चाचणी अहवाल ९.१२.२००९ ला दिला. त्यामुळे तक्रारदार यांनी चलन मिळण्यास झालेल्या २ महिन्यांच्या विलंबासाठी भरपाईची मागणी केली आहे तसेच चाचणी अहवाल दिल्यापासून ३ महिन्याच्या कालावधीनंतर म्हणजेच दि. ९.३.२०१० पासून पुढे वीज जोडणी देईपर्यंतच्या कालावधीसाठी भरपाई मिळावी अशी मागणी केलेली आहे. श्री. शिंदे, सहाय्यक अभियंता यांनी मार्च २०१० पर्यंतची पेड पेंडींग लिस्ट मंजुरी मिळणेसाठी मुख्य कार्यालयाकडे पाठविणेत आली आहे, तक्रारदाराचा प्रतिक्षा यादीतील क्र. ३४ आहे तरीही त्यांना प्राधान्याने विद्युत पुरवठा देणेत येईल असे मंचासमोर सांगितले. खालील मुद्दे निर्णयासाठी उपस्थित होत आहेत.

१) तक्रारदार हा चलन देणेस झालेल्या विलंबाबद्दल भरपाई मिळणेस हक्कदार आहे काय ?

उत्तर : होय

२) तक्रारदाराने मागणी केल्याप्रमाणे दि. ८.३.२०१० ते वीज जोडणी मिळेपर्यंतच्या विलंबाच्या कालावधीसाठी भरपाई मिळणेस हक्कदार आहे काय ?

उत्तर : होय

<u>कारणमिमांसा</u>

तक्रारदार यांनी आपली शेती गट क्र. ४८६ मध्ये ५ अश्वशक्ती वीज जोडणी मिळावी यासाठी दि. १८.६.२००९ रोजी वीज मागणीचा अर्ज नोंदविला व त्याचदिवशी रु. ५०/- प्रोसेसिंग फी भरली. त्यांना दि. १८.९.२०१० रोजी चलन देण्यात आले. कृती मानके विनियमातील तरतुदीनुसार त्यांना १ महिन्याचे मुदतीत दि. १७.७.२००९ पर्यंत चलन देणे आवश्यक होते ते त्यांना दि. १८.९.२००९ देण्यात आले आहे. तक्रारदार यांनी ते चलन दि. २२.९.२००९ ला भरले आहे. या वरुन ८ आठवड्यांचा विलंब झाला आहे हे स्पष्ट होते. विलंबाबाबत वि.प.ने कुठलेही तोंडी / लेखी स्पष्टीकरण मंचासमोर दिले नाही.

त्यामुळे मुद्दा क्र. १ चे उत्तर होय असे देण्यात येत आहे. तक्रारदार हा ८ आठवड्यांच्या विलंबाबद्दल प्रति आठवडा रु. १००/– या प्रमाणे भरपाई मिळण्यास हक्कदार आहे व वि.प.ची ती जबाबदारी आहे.

तक्रारदाराचे म्हणण्यानुसार त्यांनी दि. ५.१२.२००९ रोजी कपॅसिटर घेवून त्याची तपासणी करुन तसेच चाचणी अहवालासह सर्व कागदपत्रें वि.प.च्या कार्यालयात दि. ९.१२.२००९ रोजी दिली आहेत, परंतु वीज जोडणी देण्यात आली नाही. त्यामुळे अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, कोल्हापूर यांचेकडे दि. ३.५.२०१० रोजी तक्रार दाखल केली. अंतर्गत कक्षाचा आदेश मान्य न झालेने मंचाकडे तक्रार दाखल केली आहे. अंतर्गत कक्षाने आपल्या आदेशामध्ये ग्राहकाने स्वत: ३ पोलची लाईन उभी करुन घ्यावी व आलेला खर्च ग्राहकाच्या वीज बिलातून कंपनीच्या नियमाप्रमाणे परत द्यावा किंवा सहाय्यक अभियंता, कुरुंदवाड यांनी तक्रारदार यांचे वीज कनेक्शन मुख्य कार्यालयाची मंजुरी मिळालेनंतर प्राधान्याने देण्याची व्यवस्था करावी असे म्हटले आहे.

तक्रारदार स्वत: खर्च करु शकत नाही. त्यामुळे ३ महिन्यानंतर दि. ८.३.२०१० पर्यंत वि.प.ने वीज जोडणी देणे आवश्यक होती, ती देण्यात आली नाही. त्यामुळे वितरण कंपनी तक्रारदार यांस भरपाई देणे जबाबदार आहे व तक्रारदाराचा तो हक्क आहे. या विलंबाबाबत वि.प.ने कुठलेही स्पष्टीकरण दिले नाही, केवळ पेड पेंडींग लिस्ट मार्च २०१० अखेरची पूर्ण करण्याची असलेने मुख्य कार्यालय, मुंबई यांचेकडे मंजुरीसाठी पाठविण्यात आलेली आहे. सदर मंजुरी प्राप्त होताच तक्रारदाराचा प्रतिक्षा यादीतील ३४ क्रमांक असला तरी त्यांना प्राधान्याने वीज जोडणी देण्यात येईल असे तोंडी आश्वासन श्री. शिंदे, सहाय्यक अभियंता यांनी मंचासमोर दिले आहे यावरुन मुद्दा क्र. १ व २ मध्ये तक्रारदार हा भरपाई मिळणेस हक्कदार आहे व त्यांस वीज जोडणी मिळणे आवश्यक आहे, वि.प.ने वीज जोडणी देण्याची तयारी दर्शविली आहे. खालील प्रमाणे आदेश –

## आदेश

१) वितरण कंपनीने तक्रारदार यांस दि. १८.७.२००९ ते १८.९.२००९ या कालावधीतील चलनाच्या विलंबाबद्दल ८ आठवड्यांच्या विलंबासाठी प्रति आठवडा रु. १००/– या प्रमाणे रु. ८००/– भरपाई द्यावी.

२) तसेच वि.प.ने तक्रारदार यांस दि. ८.३.२०१० पासून वीज जोडणी होईपर्यंतच्या कालावधीसाठी प्रति आठवडा रु. १००/– या प्रमाणे भरपाई द्यावी.

३) सदर भरपाईच्या दोन्ही रकमांचे समायोजन २ बिलींग सायकलमधून वीज जोडणीनंतर करण्यात यावे. मुख्य कार्यालयाची मंजुरी मिळताच तक्रादारास वीज जोडणी वि.प.ने त्वरीत द्यावी.

४) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

५) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा(पूर्व),मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

दिनांक : ( बी. जी. पवार )
अध्यक्ष

श्री. जी.बी.पानकर, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य :

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी

( बी. जी. पवार )
अध्यक्ष